कोषागारात रोख देय अनुदान

अर्थसंकल्पीय अनुदान २०११-२०१२ ग्रामीण भागामध्ये विशेष घटक योजनेखाली अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकामधील कुटुंबांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत अनुदाने मंजूर/ मुक्त करणेबाबत (लेखाशीर्ष २२१५ ९५९५)

# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्र. ग्रापायो-१२१२/प्र.क्र.१०२ /पापु-०७

मंत्रालय, मुंबई -३२, दिनांक : ०३ ऑगस्ट, २०१२

वाचा:- १) पा. पु.व स्व. वि., शा.नि. क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक : १८ नोव्हेंबर, २०११
२) पा. पु.व स्व. वि., शा.शुद्धीपत्रक. क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक : ३० जानेवारी, २०१२
३) पा. पु.व स्व. वि., शा.शुद्धीपत्रक. क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक : ०८ फेब्रुवारी,२०१२,

**प्रस्तावना:-**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त, ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना राज्यामध्ये लागू करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील अनुसुचित जातीच्या त्याचप्रमाणे नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये वैयक्तिक शौचालये त्याचप्रमाणे खाजगी नळ जोडण्या देणे अभिप्रेत आहे.

२. सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षासाठी या योजनेसाठी विशेष घटक योजनेखाली, लेखाशीर्ष २२१५ ९५९५ खाली एकूण रु.६०.०० कोटीची तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे.

३. सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षासाठी विधिमंडळाला सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१२ (महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०१२ यांच्या अनुसुचीच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमांसह ) विधिमंडळाने मंजूर केलेला आहे, आणि तो सन २०१२ चा अधिनियम क्र.५ म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग-८ दिनांक २१ एप्रिल, २०१२ यामध्ये प्रसिध्द करण्यात आला आहे.

४. या योजनेसाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीपैकी जून २०१२ करीता रु.१५.०० कोटी तरतूद अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर निधी संबंधित यंत्रणांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत ग्रामीण भागात घ्यावयाच्या उपाययोजनांसाठी, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना रु.१००.०० लक्ष व सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांना सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ-३ मध्ये दर्शविलेल्या वाटपानुसार रु.१४००.०० लक्ष याप्रमाणे एकूण रु.१५००.०० (रुपये पंधराशे लक्ष फक्त) इतकी तरतूद मंजूर व मुक्त करण्यात येत असून अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर आहरणासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. सदर अनुदान संबंधित यंत्रणांना पुढील अटीवर रोख मुक्त करण्यात येत आहे.

अ) हे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेने खर्च करावे.

ब) ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणारा निधी जिल्हा परिषदेकडून ज्या नियमित खात्यांमध्ये जमा करण्यात येतो, त्याच खात्यामध्ये हा निधी जमा करण्यात यावा.

क) या योजनेअंतर्गत घेतलेल्या कामांचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल संचालक, पाणी स्वच्छता व सहाय्य संस्था, नवी मुंबई यांचेकडे दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत न चुकता सादर करावा.

ड) वरील मंजूर अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनाकडे विहित प्रपत्रात सादर करण्यात यावी.

इ) तसेच मासिक विवरणपत्रानुसार (Cash Flow) अनुदान खर्ची घालण्यात यावे.

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला मुक्त करण्यात आलेला निधी मिळविण्यासाठी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव किंवा प्राधिकरणाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी (श्री.बा. शि. पाटील) यांच्या सहीने तयार केलेले व उप सचिव (श्रीम.शैला ए.) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, यांना सादर करण्यात यावे. सदरहु रक्कम इसीएस प्रणालीव्दारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे खाती जमा करण्यात यावी.

४. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. वाय-२, २२१५- पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा, १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०२) (२३) अनुसुचित जाती व नवबौद्ध कुटुंबियांना वैयक्तिक पाणी पुरवठा व नळ जोडणी देण्यासाठी सहाय्यक अनुदान (२२१५ ९५९५) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व या आर्थिक वर्षासाठी त्याखालील मंजूर तरतूदीतून भागवावा.

५. सदरे शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र/३८०.व्यय ,३-दि २५.जुलै २०१२,अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra .gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०८०३१२१८५८१८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(ल.गो.ढोके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
३. सर्व विधी मंडळ सदस्य
४. प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक
५. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७. विभागीय आयुक्त (सर्व)
८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०. संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे,
११. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (WSSO) बेलापूर, नवी मुंबई
१२. महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१३. महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१४. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
१५. उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
१६. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१७. सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१८. सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१९. सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ
२०. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२१. सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
२३. सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
२४. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
२५. सर्व विशेष समाज कल्याण अधिकारी
२६. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये,
२७. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
२८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
३०. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मंुबई
३१. मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
३२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
३३. निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. प्रापायो-१२१२/प्र.क्र.१०२/पापु-०७, दिनांक: ०३ आगस्ट, २०१२ चे सहपत्र.

| अ.क्र. | जिल्हा परिषद | या शासन निर्णयान्वये उपलब्ध करून देण्यात येत असलेला निधी (रु.) | |
|---|---|---|---|
| १ | २ | | |
| १ | ठाणे | ५११५००० | (रु.एक्कावन्न लक्ष पंधरा हजार फक्त) |
| २ | रायगड | ८०५००० | (रु.आठ लक्ष पाच हजार फक्त) |
| ३ | रत्नागिरी | ३७०००० | (रु.तीन लक्ष सत्तर हजार फक्त) |
| ४ | सिंधुदुर्ग | ५८१००० | (रु.पाच लक्ष एक्याऐंशी हजार फक्त) |
| ५ | नाशिक | ६४२३००० | (रु.चौसष्ट लक्ष तेवीस हजार फक्त) |
| ६ | धुळे | १६४४००० | (रु.सोळा लक्ष चव्वेचाळीस हजार फक्त) |
| ७ | नंदुरबार | ६२७००० | (रु.सहा लक्ष सत्तावीस हजार फक्त) |
| ८ | जळगाव | ४३१९००० | (रु. त्रेचाळीस लक्ष एकोणीस हजार फक्त) |
| ९ | अहमदनगर | ७३००००० | (रु.त्र्याहत्तर लक्ष फक्त) |
| १० | पुणे | ११४७०००० | (रु.एक कोटी चौदा लक्ष सत्तर हजार फक्त) |
| ११ | सातारा | ३७०५००० | (रु.सदतीस लक्ष पाच हजार फक्त) |
| १२ | सांगली | ४७२०००० | (रु.सत्तेचाळीस लक्ष वीस हजार फक्त) |
| १३ | सोलापूर | ८७००००० | (रु.सत्त्याऐंशी लक्ष फक्त) |
| १४ | कोल्हापूर | ६७६०००० | (रु.सदुसष्ट लक्ष साठ हजार फक्त) |
| १५ | औरंगाबाद | ५६६०००० | (रु.छप्पन्न लक्ष साठ हजार फक्त) |
| १६ | जालना | २७२५००० | (रु.सत्तावीस लक्ष पंचवीस हजार फक्त) |
| १७ | परभणी | २२९५००० | (रु.बावीस लक्ष पंच्याण्णव हजार फक्त) |
| १८ | हिंगोली | १५१५००० | (रु.पंधरा लक्ष पंधरा हजार फक्त) |
| १९ | बीड | ४२३५००० | (रु. बेचाळीस लक्ष पस्तीस हजार फक्त) |
| २० | नांदेड | ७४९५००० | (रु.चौ-याहत्तर लक्ष पंच्याण्णव हजार फक्त) |
| २१ | उस्मानाबाद | ३७६५००० | (रु. सदतीस लक्ष पासष्ट हजार फक्त) |
| २२ | लातूर | ६०८५००० | (रु.साठ लक्ष पंच्याऐंशी हजार फक्त) |
| २३ | बुलढाणा | ३६३५००० | (रु.छत्तीस लक्ष पस्तीस हजार फक्त) |
| २४ | अकोला | २५३५००० | (रु.पंचवीस लक्ष पस्तीस हजार फक्त) |
| २५ | वाशिम | २४४५००० | (रु.चोवीस लक्ष पंचेचाळीस हजार फक्त) |
| २६ | अमरावती | ६७२५००० | (रु. सदुसष्ट लक्ष पंचवीस हजार फक्त) |
| २७ | यवतमाळ | ३८०५००० | (रु.अडतीस लक्ष पाच हजार फक्त) |
| २८ | वर्धा | २३८५००० | (रु.तेवीस लक्ष पंच्याऐंशी हजार फक्त) |
| २९ | नागपूर | १०४८५००० | (रु.एक कोटी चार लक्ष पंच्याऐंशी हजार फक्त) |
| ३० | भंडारा | ३०४५००० | (रु.तीस लक्ष पंचेचाळीस हजार फक्त) |
| ३१ | गोंदिया | २५२५००० | (रु. पंचवीस लक्ष पंचवीस हजार फक्त) |
| ३२ | चंद्रपूर | ४४६५००० | (रु.चव्वेचाळीस लक्ष पासष्ट हजार फक्त) |
| ३३ | गडचिरोली | १६३६००० | (रु. सोळा लक्ष छत्तीस हजार फक्त) |
| ३४ | सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई | १०००००००० | ( रु.एक कोटी फक्त) |
| | एकूण | १५०००००००० | (रु.पंधरा कोटी फक्त) |

(ल.गो.ढोके)